# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**अंत्यत महत्वाचे/तातडीचे/परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/ लेखा/ टेक्नी.प्रात्य.फी /2865
दि. २२.०१.२०१९.

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सातारा, सांगली, कोल्हापूर
जिल्हा तील सर्व मान्यताप्राप्त
शाळांना

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी )परीक्षा**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत मान्यता दिलेल्या पूर्व व्यावसायिक विषयांच्या (V१,V२,V३ व V४) प्रात्यक्षिक परीक्षेच्या शुल्काबाबत.**

**संदर्भ:-** १.शासनाचे पत्र क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३०५/एसडी-२,दि१९.०१.२०१९
२.क्र.रा.मं./परीक्षा-३ /३६८, पुणे, दिनांक १९, जानेवारी २०१९ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत मान्यता दिलेलया पूर्व व्यावसायिक विषयांऐवजी (V१,V२,V३ व V४) पुढील विषयाचा मुख्य विषयात समावेश करण्यात आलेला आहे

१. व्ही-१ ऐवजी -Multi skill Foundation Course/Introduction to Basic Tech=(८१)
२.व्ही-२ ऐवजी-Mechanical Technology (९१)
३.व्ही-३ ऐवजी Electrical Technology(९२) Electronics Technology(९३)

या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी कौशल्य चाचणी शुल्क प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क रु.४००/- आकारण्याबाबत शासनाने कळविल्यानुसार आपणास यापूर्वी कळविण्यात आलेले होते.

तथापि सदर विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा शुल्काबाबत शासन स्तरावर दि.१८.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने वरील संदर्भीय पत्र क्र ०१ नुसार उपरोक्त विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी येणा-या खर्चापैकी प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क रु.४००/- ऐवजी रु.१००/- शुल्क विद्यार्थ्याकडून आकारण्यात यावे असे कळविले आहे.

सबब उपरोक्त विषयासाठी (८१,९१,९२ व ९३) प्रति विद्यार्थी रु.१००/-प्रमाणे शुल्क संकलित करुन मंडळाकडे त्वरीत प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी चलनाव्दारे जमा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. **तसेच ज्या शाळांनी यापूर्वी उपरोक्त विषयांसाठी रु.४००/- प्रमाणे शुल्क चलनाव्दारे मंडळाकडे जमा केलेले आहे अशा शांळानी सदर चलनाची छायाकिंत प्रत या कार्यालयाकडे सादर करावी म्हणजे उर्वरित जादा जमा शुल्क रु.३००/-परत करण्याबाबत कार्यवाही करणे सुलभ होईल.**

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर